पुण्य नगरी

सोमवार, १३ एप्रिल २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये महात्मा जोतिबा फुले जयंती साजरी

**कोल्हापुर :** विवेकानंद कॉलेजमध्ये क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील व लालबहादूर शास्त्री कॉलेज, साताराचे प्राचार्य डॉ. शेखर मोहिते यांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विवेकानंद कॉलेजच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने आयोजित महात्मा जोतिबा फुले जयंती समारंभात बोलताना प्रा. समीक्षा फराकटे म्हणाल्या, महात्मा जोतिबा फुले स्त्री शिक्षण व बहुजन शिक्षणाचे प्रणेते होते. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने स्त्री शिक्षणाचा पाया घालून मोठी क्रांती घडवली. फातिमा शेख, ताराबाई शिंदे या त्यांच्या शिक्षणप्रसाराच्या विचारांनी प्रेरित झाल्या. समतेची ज्योत अखंड तेवत ठेवणे, हीच महात्मा जोतिबा फुले यांना खरी आदरांजली असेल. आभार डॉ. कविता तिवडे यांनी मानले. यावेळी आयक्यूएसीप्रमुख डॉ. श्रुती जोशी, डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आदी उपस्थित होते.

26